# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ११.०९.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) परिमंडळ क्र. ०१ चे हद्दीतुन एकुण १४६ गुन्हेगार तात्पुरते हद्यपार :—**

नागपूर शहरातील आगामी श्री गणेशोत्सव व ईतर सण/उत्सवाचे अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणेकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०१, नागपूर शहर अंतर्गत पोलीस ठाणे राणाप्रताप नगर, एमआयडीसी, वाडी, बजाजनगर, सोनेगांव व हिंगणा हद्दीतील शरीराविरूध्द, मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारे तसेच अवैध दारू विक्री करणारे एकुण १४६ इसमांना त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होण्याची दाट शक्यता असल्याने मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त, (परि.क्र.०१), नागपूर शहर यांचेकडून त्यांना प्राप्त विशेष कार्यकारी दंडाधिकारी पदाच्या अधिकारांन्वये कलम १६३(२) भा.ना.सु.सं. अन्वये **दिनांक १२.०९.२०२६ ते २६.०९.२०२६ पर्यंत १५ दिवसांचे कालावधीकरीता** त्यांना नागपूर शहराचे हद्दीत राहण्यास परावृत्त करण्यात आले आहे. आरोपींमध्ये पोलीस ठाणे राणाप्रतापनगर—४९, एमआयडीसी—४२, वाडी—१८, बजाजनगर—१५, सोनेगांव—१३, हिंगणा—०९ असे एकूण १४६ गुन्हेगारांचा समावेश असून, त्यांना नमुद कालावधीचे दरम्यान पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात प्रवेश न करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे. गुन्हेगारांनी हद्यपार आदेशाचा भंग करुन सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृती केल्यास किंवा नागपूर शहरात प्रवेश केल्यास त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल.

पोलीस प्रशासनातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, पोलीस प्रशासन हे सर्व सण—उत्सव शांततापुर्ण व सुरक्षित वातावरणात पार पडावेत याकरीता कटीबध्द आहे. नागरीकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवु नये तसेच, कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर माहीती कळवावी.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक.**

फिर्यादी शैलेष हिरामणजी गुल्हाने, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १४६, अध्यापक नगर, मानेवाडा, नागपूर हे आपले घरी हजर असतांना, त्यांचा मित्र नामे कार्तीक उर्फ शुभम पुरूषोत्तम धार्मिक, वय ३३ वर्षे, रा. विनकर वसाहत, अजनी, नागपुर याचा त्यांचे मोबाईलवर फोन आला व त्याने सांगीतले की, त्याचे मानेवाडा रोड येथे सुनिल बानाईत व चंद्रमणी नगराळे यांचे सोबत भांडण झाले आहे व तो त्यांचे घरी जात आहे. यावरून फिर्यादी यांनी त्यास 'मी सोबत येतो' असे म्हणुन, त्यांचे बलॅनो कारने सोबत मित्र बबलु सोलंकी व भावेश राव यांचेसह कार्तीक चे परीवर्तन चौक येथील ऑफीस मध्ये गेले व तेथुन आरोपी क्र. १) सुनिल पांडुरंग बानाईत, वय ४८ वर्षे, रा. गोटाळपांजरी, बेलतरोडी याचे घरासमोरील रोडवर गेले व कार्तीक याने सुनिल यास फोनद्वारे बोलाविले. कार्तीक व सुनिल यांचा प्रॉपर्टीचे पैश्यांबाबत वादविवाद असल्याने, त्याचेत बोलनी सुरू असतांना कार्तीक याने सुनिल बानाईत यास चंद्रमणी नगराळे याला बोलाविण्यास म्हटले. दिनांक १०.०९.२०२६ चे २३.५० वा. सुमारास, पांढऱ्या रंगाचे डस्टर गाडीने आरोपी क्र. २) आनंद सुरेश ठाकुर, वय ३० वर्षे, रा. महात्मा फुले नगर,

मानेवाडा रोड, अजनी, नागपुर ३) पुर्णचंद्रमणी डोमाजी नगराळे, वय ५५ वर्षे, रा. चिचवन, सलाई, नागपुर ४) सुलभ संजय दिवेकर, वय २९ वर्षे, रा. प्लॉट नं. ३, वकीलपेठ, नागपुर ५) निलेश नरेश टेंभुर्णे, वय ३७ वर्षे, रा. महाकाली नगर नं. ३, मानेवाडा, नागपुर ६) आकाश महेश यादव, वय ३३ वर्षे, रा. महात्मा फुले नगर, सिध्देश्वर सभागृह मागे, मानेवाडा रोड, नागपुर यांनी येवुन, आनंद ठाकुर याने गाडी फिर्यादीचे अंगावर आणुन थांबविली. सर्व गाडीचे खाली उतरले. आरोपींनी संगणमत करून आनंद ठाकुर याने त्याचे जवळील अग्नीशस्त्र बाहेर काढले असता, फिर्यादी व कार्तीक हे त्यांचे बलॅनो गाडीत बसण्यास जात असतांना, आनंद ठाकुरने जिवे ठार मारण्याचे उद्येशाने त्यांचेवर फायर केल्याने, कार्तीक यास बंदुकीच्या दोन गोळ्या लागुन तो जखमी झाला. फिर्यादी व ईतर मित्र यांनी जखमी कार्तीक यास घेवुन सर्व गाडीत बसुन एम्स हॉस्पीटल येथे गेले. कार्तीक उर्फ शुभम यास एम्स हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१), १८९(१), १८९(९), १९०, १९१(२), १९१(३) भा.न्या.सं., सहकलम ३, २५ भा.ह.का. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करुन, पोलीसांनी घटनेची तात्काळ दखल घेतली.

गुन्ह्याचे समांतर तपासात वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा येथील युनिट क्र. ४, युनिट क्र. २, युनिट क्र. ५, भुमाफीया पथक, पोलीस आयुक्त यांचे विशेष पथक, नॅटग्रीड पथकाचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. तसेच, परिमंडळ क्र. ४ अंतर्गत पोलीस ठाणे अजनी, हुडकेश्वर, बेलतरोडी येथील पथके, रात्रगस्त पेट्रोलींग स्टाफ व सर्व पेटोलींग वाहने यांनी नियंत्रण कक्ष अधिकारी व सि.ओ.सि. चे अधिकारी व अंमलदार यांचे संपर्कात राहुन आरोपींचा तांत्रीक तपासाद्वारे, त्यांचे वाहनाचे वर्णनावरून व मोबाईलद्वारे शोध घेवुन, आरोपींना बुटीबोरी, चंद्रमणी नगर व गोटाळ पांजरी परीसरातुन ताब्यात घेतले. नमुद आरोपी क्र. १ ते ६ व ७) सोनु उर्फ धर्मेंद्र राधेशाम ठाकुर, वय ३४ वर्षे, रा. पांजरी लोढी, हनुमान मंदीर जवळ, डोंगरगांव यांना गुन्ह्यात अटक केलेली आहे. आरोपींचे ताब्यातुन मारूती सुझुकी ब्रिझा कार क्र. एम.एच. ४० सिए ५३२०, रेनॉल्ट डस्टर कार क्र. एमएच. ४९ एई ६३३२ असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. अटक आरोपींना मा. न्यायालयासमक्ष हजर करून, त्यांची दिनांक १५.०९.२०२६ पावेतो पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आली आहे. पुढील तपास वपोनि. रविंद्र नाईकवाड हे करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र.४), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग), मा. श्री. महेश चव्हाण, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे पोनि. बि.एन. राऊत, सपोनि. वैभव बारंगे, पोहवा. देवेंद्र नवघरे, पुरूषोत्तम जगनाडे, नरेंद्र बांते, युनिट क्र. २ च्या मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखडे व अंमलदार, युनिट क्र. ५ चे पोनि. विनायक गोल्हे, सपोनि. गणेश कदम, पोउपनि. विशाल सांगोडे व अंमलदार, भुमाफीया पथकाचे मपोनि. श्रीमती संजीवनी थोरात व अंमलदार, माा. पोलीस आयुक्त यांचे विशेष पथकाचे सपोनि. भगवान कोळी व अंमलदार, नॅटग्रीड पथकाचे पोउपनि. नडगिरे व अंमलदार, सायबर क्राईमचे पोउपनि. विवेक झिंगरे व अंमलदार, पो.ठाणे बेलतरोडी चे वपोनि. रविंद्र नाईकवाड, सपोनि. रामेश्वर कांडुरे, पोउपनि. नारायण घोडके, ईतर अधिकारी व अंमलदार, अजनीचे वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, हुडकेश्वर च्या मवपोनि. श्रीमती अनामिका मिर्झापुरे, नियंत्रण कक्ष येथील सपोनि. कात्रे व बिट मार्शल तथा ईतर पेट्रोलींग अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**२) गुन्हेशाखा, युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :— फुस लावुन पळवुन नेणाऱ्या आरोपीस ०३ तासात अटक.**

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत राहणारे ३९ वर्षीय फिर्यादी यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे येवुन तक्रार दिली की, आरोपी सिध्दार्थ अरूण पिल्लेवान, वय २६ वर्षे, रा. शास्त्री नगर, नंदनवन झोपडपट्टी, नागपुर याचे व त्याची पत्नी यांचे आपसांत भांडण झाल्याने, फिर्यादी यांनी आरोपीचे पत्नीस दवाखान्यात घेवुन गेले व आरोपी यास भांडण न करण्याची समज दिल्याने याचा राग मनात धरून, आरोपीने दिनांक ११.०९.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, फिर्यादीच्या १४ वर्षीय मुलास त्याचे राहते घरून, 'तुला तुझे पप्पाकडे नेतो' असे म्हुणन, फुस लावुन पळवुन नेले व फिर्यादी यांना फोन करून, 'माझे पत्नीला लवकरात लवकर घरी आणुन द्या, नाहीतर तुझ्या मुलाचे बरे—वाईट करील' असे बोलुन फोन कट केला. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम १३६(२), १४०(१), ३५१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, युनिट क्र. ४ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन, फिर्यादीची भेट घेतली. तसेच, आरोपी व नातेवाईकांची माहीती काढुन, तांत्रीक तपास करून, पोअं. गोविंद देशमुख यांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस पोलीस ठाणे पारडी हद्दीतुन ताब्यात घेतले. फिर्यादीचे मुलास सुखरूप त्यांचे ताब्यात देण्यात आले आहे. आरोपीस गुन्ह्यात अटक करून, त्याचे ताब्यातुन गुन्ह्यात वापरेलेले मोपेड वाहन क्र. एम.एच. ३१ सिझेड ८३४९ किंमती २०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, सफौ. नाजीर शेख, पोहवा. अतुल चाटे, अभिषेक शनिवारे, पुरूषोत्तम काळमेघ, पोअं. गोविंद देशमुख व श्रीकांत मारवाडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे तहसिल :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.०९.२०२६ चे ०९.३० वा. ते १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे तहसिल हद्दीत मेयो हॉस्पीटल अपघात विभागासमोरील पार्कीगजवळ चारचाकी वाहन क्र. एम.एच १२ एचएफ ०५६० चे चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, एक अनोळखी इसम वय अंदाजे ६५ वर्षे वयाचे यांना धडक देवुन पळुन गेला. अपघातामध्ये अनोळखी ईसमाचे डोक्याला मार लागुन ते गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, अपघात विभाग येथे नेले असता, उपचारादरम्यान ११.४५ वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी सुरक्षा पर्यवेक्षक एमएसएफ चे राहुल गौतम साळवे, रा. रेल्वे पेट्रोल पंप मागे, अजनी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. निशांत पवार ९१५८०१४२८५ यांनी कारचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१ भा.न्या.सं., सहकलम १८४, १८७, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :–** श्रीमती वसुधा राजु ढेंगरे, वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ४९, चिटणविस नगर, नंदनवन, नागपूर ह्या दिनांक ०७.०९.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, केस– काळे लांब, भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे नंदनवन</u> :–** कु. जयश्री सुधाकर बसेशंकर, वय १८ वर्षे, रा. पडोळे नगर, धर्मपाल मेश्राम चे घराजवळ, नंदनवन, नागपूर ही दिनांक ०८.०९.२०२६ रोजीपासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– मजबुत, केस– काळे, अंगात– पिवळ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



श्रीमती वसुधा



कु. जयश्री

**स्वा/–**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# अधिसूचना/ निर्देश

(भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६३, १५३, १५४ अन्वये)

## OYO अंतर्गत चालणारे हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस व निवास व्यवस्था यांच्या सुरक्षा, ग्राहक पडताळणी व अभिलेख देखभालीबाबत निर्देश.

ज्याअर्थी, आमचे असे निदर्शनास आले आहे की, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत काही ठिकाणी OYO हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, होम–स्टे व तत्सम निवास आहेत. परंतु शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वाचे पालन प्रामुख्याने होत नसल्याने निदर्शनास आलेले आहे.

ज्याअर्थी, नागपूरचे पोलीस आयुक्त यांच्याकडून ओयो (OYO) आणि इतर सर्व हॉटेल्ससाठी ऑपरेशन शक्ती (Operation Shakti) अंतर्गत अत्यंत कडक मार्गदर्शक तत्त्वे (Adhisuchana/Guidelines) जारी करण्यात आले आहेत. हे नियम प्रामुख्याने मानवी तस्करी (Human Trafficking), बेकायदेशीर देहविक्री आणि फसवणूक रोखण्यासाठी लागू केले गेले आहेत.

आणि ज्याअर्थी, वरील बाबी लक्षात घेता, नागपूर शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत OYO अंतर्गत चालणारे हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस व निवास व्यवस्था यांच्या सुरक्षा, ग्राहक पडताळणी व अभिलेख देखभालीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे

आणि म्हणून मी, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ कलम १६३ मधील संबंधित तरतुदीनुसार निर्देश जारी करत आहे त्याचे नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व OYO हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, होम–स्टे व तत्सम निवास व्यवस्थांचे मालक/व्यवस्थापक यांनी काटेकोरपणे पालन करावे.

१. **ग्राहकाची ओळख पडताळणी** – प्रत्येक ग्राहकास खोली देण्यापूर्वी त्याचे वैध ओळखपत्र (आधार कार्ड, पासपोर्ट, वाहन परवाना इ. तपासून त्याची आवश्यक माहिती हॉटेलच्या नोंदवही/डिजिटल प्रणालीमध्ये नोंदवावी.

२. **ग्राहक नोंदवही** – प्रत्येक Check in and Check out ची अचूक नोंद ठेवावी. ग्राहकाचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, ओळखपत्राचा प्रकार व क्रमांक तसेच Check in/Check out वेळ नोंदवावी.

३. **संशयास्पद व्यक्ती** – संशयास्पद हालचाल, बनावट ओळखपत्र, संशयास्पद बुकिंग, बेकायदेशीर कृत्य किंवा गुन्ह्याची शक्यता आढळल्यास तत्काळ संबंधित पोलीस ठाण्यास माहिती द्यावी.

४. **CCTV व्यवस्था —** हॉटेलच्या प्रवेशद्वार ते बुकिंग केलेल्या रूम पर्यंत सीसीटीव्ही असणे आवश्यक आहे हॉटेलच्या सार्वजनिक ठिकाणी व्यवस्था ठेवणे अनिवार्य आहे सीसीटीव्ही अभिलेख जतन करण्याचा कालावधी जास्तीत जास्त असावा (कीमान एक वर्षाचा असावा). पोलीसांनी तपासाकरिता सीसीटीव्ही फुटेजची मागणी केल्यास त्वरीत उपलब्ध करून द्यावे. सीसीटीव्ही प्रणाली नादुरुस्त झाल्यास त्वरित दुरुस्त करून लावणे अनिवार्य आहे

५. **अभिलेख उपलब्धता —** ग्राहकांच्या प्रवेश व बाहेर जाण्याच्या नोंदी, येण्याची व जाण्याची तारीख व वेळ अशी सर्व माहिती अनिवार्यपणे जतन करून ठेवावी. ग्राहक नोंद, बुकिंग माहिती, CCTV फुटेज व इतर संबंधित अभिलेख कायद्यानुसार पोलीस अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास तात्काळ उपलब्ध करून द्यावेत.

६. **अनधिकृत व्यक्तींना प्रवेश—** हॉटेलच्या खोलीमध्ये नोंद नसलेल्या/अपरिचित व्यक्तींना प्रवेश देताना आवश्यक सुरक्षा पडताळणी करावी. नागपूर शहरातील सर्व ओयो हॉटेल व इतर हॉटेल्स येथील सर्व कर्मचारी व अधिकारी यांची ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र तसेच इतर सर्व कागदपत्रांची फाईल त्यांच्या अद्ययावत फोन नंबर सहीत हॉटेल मालक यांचे कडे अनिवार्यपणे सतत उपलब्ध असावी.

७. **अल्पवयीन व्यक्ती —** अल्पवयीन व्यक्तींच्या बाबतीत लागू कायदे व सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. अल्पवयीन व्यक्तीच ओळखपत्र व निवास स्थानासंबंधी पडताळणी केल्यावर फक्त पालक सोबत असेल तरच प्रवेश द्यावा.

८. **आपत्कालीन परिस्थिती —** गंभीर गुन्हा, भांडण, मारामारी, संशयास्पद मृत्यू, आत्महत्येचा प्रयत्न, हरवलेली व्यक्ती किंवा इतर आपत्कालीन परिस्थिती मध्ये तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेशी संपर्क साधावा.

**१. हॉटेल मालकांसाठी मुख्य नियम (Mandatory Rules for Hotels)**

**झिरो टॉलरेंस बोर्ड—** प्रत्येक OYO आणि हॉटेलच्या मुख्य भागामध्ये मानवी तस्करी आणि बेकायदेशीर कामांना कोणताही थारा दिला जाणार नाही कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आल्यास त्वरित पोलिसांना संपर्क केला जाईल असा झिरो टॉलरंस (Zero Tolerance) स्पष्ट व ठळक शब्दांत फलक लावणे बंधनकारक आहे.

**कडक ओळख पडताळणी—** हॉटेलमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे वैध ओळखपत्र (ID Proof) तपासणे आणि त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

**सीसीटीव्ही (CCTV) देखरेख—** हॉटेलच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि लॉबीमध्ये २४ तास सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असणे आवश्यक आहे. त्याचा जतन कालावधी किमान ०१ वर्ष किंवा जास्त असावा.

**बोगस ब्रँडिंगवर कारवाई—** नागपूर पोलीस आणि OYO कंपनीने संयुक्त मोहीम राबवून अनधिकृतपणे 'OYO' चे नाव वापरणाऱ्या २० पेक्षा जास्त हॉटेल्सचे साईनबोर्ड हटवले आहेत आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू आहे. अशा प्रकारे इतर कोणी अधिकृत असल्याशिवाय आपले हॉटेल्सवर बोर्ड लावु नये.

**२. अविवाहित जोडप्यांसाठी (Rules for Unmarried Couples)**

**कायदेशीर अधिकार—** जर मुलगा आणि मुलगी दोन्ही सज्ञान (Adults 18 वर्षे किंवा त्याहून अधिक) असतील, तर स्वत:च्या संमतीने हॉटेलमध्ये एकत्र राहणे पूर्णपणे कायदेशीर आहे. परंतु

त्यांचे ओळखपत्र नोंद व जतन करणे अनिवार्य आहे. अविवाहित व्यक्ती अधिकृत वयाचे असतील तरीही काटेकोरपणे त्यांचे ओळख, वय व निवासस्थानाची शहानिशा करून हॉटेलच्या रजिस्टरमध्ये नोंदी घेणे अनिवार्य राहील.

**वैध ओळखपत्र आवश्यक** – विवाहित व अविवाहित व्यक्तींकडे मूळ आधार कार्ड (Aadhaar Card), ड्रायव्हिंग लायसन्स किंवा पासपोर्ट असणे अनिवार्य आहे. (पॅन कार्ड सामान्यतः स्वीकारले जात नाही) ज्या ओळखपत्रात जन्म दिनांक व स्थायी पत्ता नमूद आहे अशा प्रकारचे ओळखपत्र प्राप्त करावे.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत OYO हॉटेल, लॉज, गेस्ट हाऊस, होम–स्टे व तत्सम निवास हे भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ नुसार गुन्हा दाखल होण्यास पात्र राहतील.

सदर आदेश दि.11/09/२०२६ चे ००/०१ वा. पासून ते दि.09/11/२०२६ चे २४/००वा. पर्यंत लागु राहील.

हा आदेश दि.10/09/२०२६ रोजी माझे सही शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात आला आहे.

ठिकाण: नागपूर शहर.

(विश्वास नांगरे पाटील)भापोसे
पोलीस आयुक्त, नागपूर शहर